प्रकरण चौथे

# वैचारिक : ग्रंथ, निबंध व भाषणे

प्रकरण चौथे

# वैचारिक : ग्रंथ, निबंध व भाषणे

**प्रास्ताविक :**

प्रस्तुत प्रकरणात कृष्णराव भालेकरांच्या वैचारिक गद्याचा अभ्यास करावयाचा आहे. यामध्ये 'शास्त्राधार' व 'निराश्रित हिंदु आणि ब्राह्मण क्षत्रिय' ही पुस्तके आहेत. 'शंकराचार्य काय करून असतात?', 'तेलगू तरुणास उद्देशून' आणि 'ब्राह्मणांवर रागावण्याची कारणे' इ. निबंध उपलब्ध आहेत. त्याचबरोबर 'कारखाने आणि व्यापार चालविणारी शेतकरी मंडळी' व 'शेतकऱ्यांनो डोळे उघडा' या दोन भाषणांचा समावेश केला आहे.

हे वैचारिक निबंध लिहून भालेकरांनी सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय जीवनाचा वेध घेतला आहे. म्हणून त्यांच्या वैचारिक लेखनाला अधिष्ठान प्राप्त झाले आहे. प्रस्तुत प्रकरणात भालेकरांच्या या वैचारिक निबंधातील वाङ्मयीन वैशिष्ट्यांचे स्वरुप पाहणे हा हेतू आहे. निबंधाची कालक्रमानुसार मांडणी करून वाङ्मयीन वैशिष्ट्यांचा शोध घ्यावयाचा आहे.

**वैचारिक साहित्य :**

एकोणिसावे शतक हे महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक व शैक्षणिक या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. या शतकात आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीचा पाया घातला गेला. पेशवाईचा ऱ्हास झाल्यानंतर ब्रिटीश राजवट सुरू झाली. प्रशासन खाते, शिक्षण खाते, न्याय खाते याबाबतीत सुधारणा घडून आल्या. मराठी भाषेचे व्याकरण कोष निर्माण झाले. त्याचबरोबर वाङ्मय निर्मितीला प्रोत्साहन मिळाले. नवीन शिकलेला वर्ग धर्म व वाङ्मय खितपत पडलेल्या बहुजन समाजाला शिक्षण मिळू लागले. यातूनच समाजसुधारकांचा उदय होऊ लागला. त्यामध्ये बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, भास्कर पांडुरंग, रामकृष्ण विश्वनाथ, का. त्रिं. तेलंग, परशुराम तात्या गोडबोले, भाऊ महाजन, न्या. रानडे, लोकहितवादी, विष्णूबुवा ब्रह्मचारी, महात्मा फुले, कृष्णराव

भालेकर, ताराबाई शिंदे हे विचारवंत व समाजसुधारक निर्माण झाले व यातूनच वैचारिक साहित्य उदयास येऊ लागले.

**शास्त्राधार :**

कृष्णराव भालेकरांनी इ. स. १९०८ मध्ये 'शास्त्राधार' नावाचे छोटे संवादात्मक पुस्तक लिहिले. खेड्यातील अज्ञानी शेतकऱ्यांना धर्माच्या नावाखाली लुटले जात होते. देव, धर्म, रुढी व परंपरा हे सांगणारे शास्त्राधाराचे बुजगावणे भटभिक्षुकांनी या लोकांच्यापुढे उभे केले. याचाच फायदा घेऊन तत्कालीन ब्राह्मणांनी काही ग्रंथ निर्माण केले. या ग्रंथातून खोटे विचार मांडून सर्वसामान्य लोकांची फसवणूक करण्याचे काम चालू केले. इंग्रज लोकांचे राज्य येण्यापूर्वी ब्राह्मण म्हणजे भिक्षांदेही करणारे लोक होते. असा प्रकार असल्यामुळे व्रते, उपोषणे, देव, देवळे यांच्या फंदात लोक जितके अधिक गुरफटतील तेवढे आपले अधिक हित आहे. कोणतेही कष्ट न घेता आपणास सुलभतेने धनधान्य प्राप्त होते. हे भटभिक्षुकांनी चांगलेच ओळखले होते. म्हणून प्राकृत व संस्कृत अशा दोन्ही भाषेत 'शिवलीलामृत', 'धर्मसिंधू' वगैरे ग्रंथ लिहिले. अशिक्षित लोकांना आपल्या भ्रमात दडपून ठेवण्याचा प्रयत्न केला. हे ग्रंथ देवांनीच लिहिले आहेत. या ग्रंथाच्या पलीकडे जाऊन लोकांनी विचार करू नये म्हणून मोठमोठ्या देवांची नावे घालून ग्रंथास सुरुवात केली आहे.

प्रत्येक गोष्ट ग्रंथाधाराशिवाय म्हणजे शास्त्राधाराखेरीज निंदा अथवा त्याज्य किंवा लटकी समजावी. हे भटभिक्षुकांनी ग्रंथातून लोकांच्या मनावर बिंबवले. विवेक, सुधारणा, धर्म, देव या सर्वांना मागे सारुन शास्त्राधार अधिक बलवान झाला. याचा परिणाम कनिष्ठ वर्गावर झाला. या वर्गाचे लोक शास्त्राधाराच्या जाळ्यात अधिक गुरफटून गेले होते. या शास्त्राधाराचा खेड्यापाड्यातील लोकांनी खूप बाऊ केला होता. या बाऊचे खरे स्वरूप लोकांना समजावे आणि लोकांनी निर्भय चित्ताने सुधारणेच्या मार्गास लागावे.[१] या उद्देशाने भालेकरांनी 'शास्त्राधार' हे पुस्तक लिहिले आहे.

हे पुस्तक आकाराने लहान असले तरी ते आशयाच्या दृष्टीने व्यापक आहे. या पुस्तकाचा प्रारंभ संवादाने झाला आहे. यशवंत हा सत्यशोधक समाजाचे प्रतिनिधीत्व

करणारा आहे. 'शास्त्राधारा'च्या विळख्यात अडकलेले दगडूजी पाटील व ब्राह्मण समाजाचे प्रतिनिधीत्व करणारा बाळंभट हा धूर्त भटजी आहे. ब्राह्मणांनी लोकांच्यावर 'शास्त्राधारा'चा प्रभाव पाडून लोकांना पुरतेच जाळ्यात गुरफटून ठेवले आहे. सर्व गोष्टी 'शास्त्राधारा'नेच केल्या पाहिजेत हे सांगताना बाळंभटजी म्हणतात, कारण शास्त्राधाराखेरीज सर्वच लटके आहे. असा हा बाळंभटजी आपले विचार पाटलाच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न संवादातून करतो. या संवादाचे स्वरूप प्रश्नोत्तर आहे. संवादाची भाषा परखड व उपहासात्मक आहे. यामध्ये बाळंभटजीने शास्त्राधाराची व्याख्या केली आहे. ती अशी, ''प्रत्येक धार्मिक गोष्ट करताना आपण शास्त्राचा आधार घेऊन चालणे म्हणजे शास्त्राधार''. या व्याख्येतून बाळंभटजीने 'शास्त्राधारा'चे महत्त्व पटवून दिले आहे. शास्त्राधाराखेरीज सर्व निरर्थक आहे. तसेच सत्यशोधक चळवळ ही खोटी व निराधार आहे. हे त्याने 'शास्त्राधार' यामधून स्पष्ट केले आहे. या सर्व गोष्टींना विरोध करून यशवंतने बाळंभटजीला चांगलेच धारेवर धरले आहे.

यशवंतरावाने बाळंभटजीला प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. पेशवाईच्या पूर्वी कोकणस्थांची पेशवाई माजल्यावर देशस्थ ब्राह्मण यांच्यात अन्नपाणी व्यवहार सुरू झाला. हा 'शास्त्राधार' किंवा सत्ताधार? ब्राह्मणांनी परिस्थितीनुसार स्वत:चे आचारविचार बदलले आहेत. यजमानाच्या राणीला सती घालवून जाळून मारणे व राजसत्ता मिळविणे याला 'शास्त्राधार' किंवा स्वार्थाधार म्हणावा? या उदाहरणावरून स्पष्ट होते. सत्तेसाठी ब्राह्मणांचा 'शास्त्राधार' कोणत्या स्तरांस जाईल हे सांगता येत नाही. यजमानाची बुद्धिभ्रंश झालेली संधी साधून खोट्या सह्यांची सनद उपटून पेशवाई बळकावली. हा शास्त्राधार किंवा राज्यलोभाधार महादजी शिंदे यांनी पेशवाईच्या दरबारांपुढे पादुका बगलेत मारुन हिशेब देण्यास 'शास्त्राधार' दाखविला. किंवा पानिपतच्या लढाईत दोन लक्ष मनुष्य बळी देण्याप्रसंगी नानासाहेब पेशव्यास ज्योतिषाच्या सल्ल्याने मोहिमेचा जो मुहूर्त काढला. हा 'शास्त्राधारा'नेच काढला होता का? चारही वेदांचे इंग्रजी भाषांतर करण्यास 'शास्त्राधार' सापडतो. पण आम्हाला ते ऐकण्यास व वाचण्यास बंदी आहे. 'शास्त्राधार' म्हणजे तुमचाच

हात व तुमचीच थुंकी या बोटावरून त्या बोटावर करणारे तुम्हीच. मुसलमान व इंग्रज लोकांना 'शास्त्राधार' दाखवून त्यांच्या मृत वडिलांस सामान पुरविण्याचे 'श्राद्धाचे भक्ते' तुम्ही होत नाही. तेथे त्यांच्या ठोशांस बुटास तुमचा 'शास्त्राधार' काय म्हणून थरथर कापतो? असे एकापेक्षा एक प्रश्न विचारून भालेकरांनी ब्राह्मणांच्या 'शास्त्राधारा'वर हल्ला चढविला आहे. या भटभिक्षुकांनी आपले पोट भरण्यासाठी स्वार्थी व मतलबी हेतूने 'शास्त्राधारा'चा आधार घेतला. हे भालेकरांनी ओळखले होते. म्हणून भालेकर कठोर शब्दांत म्हणतात, ''नाटके, तमाशे यात मिशा काढून स्त्रीवेष धारण करून गाण्यास व नाचण्यास ब्राह्मण पुरुषांस 'शास्त्राधार' सापडावा व आम्हास आमच्या मातापितरांच्या दशक्रियेचे विधी भटास न बोलाविता स्वत: क्षौर करण्यात 'शास्त्राधार' मिळू नये काय?''[२] शेतकऱ्याच्या जमिनी लुबाडण्यास, बैल, रेडे पाळण्यास, औतकाठी सामान तयार करण्यास व शेती करण्यास 'शास्त्राधार' सापडतो. पण शेतकऱ्यांनी स्वत:च्या पैशांनी व कष्टांनी बांधलेल्या नव्या घरात ब्राह्मणांकडून पूजा करून घेतल्यानंतर राहण्यास जायला 'शास्त्राधार' मिळत नाही. पोथीचे वाचन केल्याशिवाय भाऊबंद व इष्टमित्रास पुनर्विवाह भोजन घालण्यास शास्त्राधार आहे. भटभिक्षुकांना विधवा मुलीचे पुनर्विवाह लावण्यास शास्त्राधार सापडत नाही. पण यजमानाच्या मुलीचे लग्न लावण्यास सापडत नाही. स्वार्थी, मतलबी हेतूने ब्राह्मणांनी लोकांची फसवणूक करण्याचा सपाटा चालविला आहे. हे या संवादातून दिसून येते. सर्व ब्राह्मण हे लोकांना धाक दाखवून लोकांना तसे वागायला लावतात. पण स्वत: मात्र विरोधी वागत असतात. हे नजरेसमोर येते.

खून करा, दरोडे घाला, विश्वासघात करा, खोटे दस्तऐवज करून साक्षी द्या, दारू प्या, रंडीबाजी, जुवा खेळा काहीही करा. पण पंधरवड्यास किंवा महिन्यात सत्यनारायणाची पोथी वाचून आम्हास भोजने घाला. ब्राह्मणांस दक्षिणा व भोजने देण्याचे बंद करू नका. कारण, ''ब्राह्मण जहाला भ्रष्ट तरी तिन्ही लोकी श्रेष्ठ''. अज्ञानी, भोळसट, मूर्ख लोकांत तो श्रेष्ठ खरा. तसेच 'शूद्र कितीही जाहला श्रेष्ठ, तरी छाकट्या भटापेक्षा भ्रष्ट' यामध्ये धूर्तांनी शूद्रांना आपल्या शास्त्राधाराच्या जाळ्यात गुरफटून ठेवले आहे हे पटवून देण्यासाठी

भालेकरांनी कथेचे उदाहरण दिले आहे. सावकाराकडून दक्षिणा लुटून निघालेल्या धूर्त ब्राह्मणांची व त्यांना लुबाडण्याचा प्रयत्न करणाऱ्या भिल्लांची कथा आहे. सावकाराने आमच्या जमिनी घशाखाली घातल्या. याला शास्त्राधार काय? त्याच सावकाराकडून तुम्ही दक्षिणा लुटून निघालात? याला कोणता शास्त्राधार आहे व तुमच्याजवळील दक्षिणा लुटण्याचा आम्हाला तरी कोणता शास्त्राधार आहे? अशी समर्पक कथा सांगून भालेकरांनी अप्पलपोटे भिक्षुकांवर हल्ला चढविला आहे.

स्वत:ला ब्राह्मण हे मूर्तिमंत धर्मशास्त्रच समजतात. कोणत्याही प्रकारचे शारीरिक कष्ट न घेताच पैसे व धनधान्य आपोआप घरात येते. या जन्मात भटभिक्षुकास दान दिले तर मेल्यानंतर ब्राह्मण हजार पटीने देतात. यासाठी भालेकरांनी गाईचे व लाडवाचे उदाहरण दिले आहे. अशा भ्रामक समजुतीचे थोतांड रचून एक चाकोरी तयार केली आहे. या चाकोरीतून शूद्रातिशूद्रांना बाहेर पडता येऊ नये म्हणून ब्राह्मणांनी प्रत्येक धार्मिक गोष्टीला शास्त्राधार निर्माण केला आहे. हा त्यामागे हेतू आहे. हा अन्याय, अत्याचार हे अशिक्षित शेतकरी निमूटपणे सहन करीत असतात. या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी 'विद्या शिका', असे भालेकर सुचवितात. 'विद्या' शिकण्याचा मार्ग हा या धूर्तांना विचार नये.[३] कारण ते 'मेंढराची कातडी पांघरलेले लांडगोपंतच' आहेत. अशाप्रकारे भालेकरांनी त्यांच्या फसवेगिरीचा व लबाडीचा प्रत्यय आणून दिला आहे. यामधून भालेकरांनी सत्यशोधक विचार मांडला आहे.

स्वार्थी, मतलबी, ढोंगी, धूर्तांनी आपले हित साधण्यासाठी हे 'शास्त्राधार' निर्माण केले आहेत. 'शास्त्राधार' सांगणारे भटभिक्षुक शूद्रातिशूद्रांना वाडवडिलांची चाल सोडू नका, असे सांगतात. पण आपण मात्र यांच्या विरोधात वागत असतात. ''भिक्षेच्या झोळ्या, हरणाची कातडी, दर्भाच्या जुड्या ही जाऊन, त्यांच्याऐवजी ब्राह्मणांच्या घरी टेबलखुर्च्या, भरजरी कपडे, गाद्या, उशा, सोनेनाणे'' हे शूद्रातिशूद्रांच्या जीवावर लुटून ऐषआरामात राहणे हा शास्त्राधार कोणता? असा जाब भालेकरांनी विचारला आहे. ब्राह्मण मंडळींच्या स्त्रियांच्या अंगावर कष्ट न करता सोने, मोती, चांदी यांचे हे दागिने कोठून आले. याला कोणता शास्त्राधार? ब्राह्मणमंडळींनी आपले मतलब साधण्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी

घशाखाली घातल्या. जेणेकरून मुबलक जमिनी, धनधान्ये, मानपान, पगार, लाचलुचपत व पेन्शन मिळेल, असे ते सर्वधंदे व नोकरी करण्यास ब्राह्मणांस शास्त्राधार मिळत आहे. असा भालेकरांनी विचार व्यक्त केले आहेत.

बाजारातील कसबीण स्त्रीच्या हातचे जेवण भटभिक्षुकांना चालते पण शूद्रातिशूद्र लोकांचा स्पर्श चालत नाही. त्यांची सावलीही अंगावर पडून घेत नाही. म्हणून भालेकर म्हणतात, "शेणाच्या स्पर्शाने सोवळे विटाळत नाही. पण आमच्या अन्नाच्या स्पर्शाने सोवळे विटाळते! आमच्या अन्नापेक्षा विष्ठा भक्षणाऱ्या गाईबैलांची विष्ठा ब्राह्मण लोक, शुद्धी करणारी व सेवनीय समजतात."[४] याचा अर्थ असा की, गाई बैलांच्या विष्ठेएवढी सुद्धा ब्राह्मण शूद्रातिशूद्रांना किंमत देत नाही, हे भालेकरांनी सोवळ्यातील फोलपणा दाखवून या पध्दतीवर ताशेरे ओढले आहेत.

भिक्षुकांची दुष्टता पटवून देण्यासाठी भालेकरांनी कुंभाराचे उदाहरण दिले आहे. जसे कुंभाराला वाटते माझी गाढवे ओझी नेण्यास तयार असतात तसे हिंदु म्हणविणारे पण ओवळे हिंदु गुलाम ब्राह्मण समाजाची ओझी वाहणारी गाढवे बनली आहेत. ब्राह्मणाच्या पायाचे तीर्थ घेऊन त्याच्या पायावर डोके ठेवतात आणि हात जोडून म्हणतात, "काय आज्ञा आहे गुरुजी". एखाद्या बंदिवान कैद्याप्रमाणे उभे राहिलेले असतात. "असली सोवळ्या धन्याची ओवळी गुलामगिरी जगावर कोठे चालू असेल व ती कोणत्या भटबच्च्यास ठाऊक असेल तर त्याने मजला दाखविण्याचा प्रयत्न करावा".[५] या परखड शब्दांत भालेकरांनी भटभिक्षुकांना आवाहन केले.

लुबाडणूक व फसवेगिरी करणाऱ्या ब्राह्मणांच्या कूट कारस्थानावर आघात करून त्यांचे मतलब उघड केले आहेत. ब्राह्मणांचा जन्म दिसण्यात मोठा असतो. पण तत्कालीन परिस्थिती पाहता ब्राह्मणांचा जन्म व्यर्थ हो व्यर्थ हे बाळंभटजीने कबूल केले. हे पटवून देण्यासाठी "जातीचा ब्राह्मण न करिता संध्यास्नान" हा भालेकरांनी अभंग दिला आहे. या स्वार्थी मनोवृत्तीतून बाळं भटजीचे दर्शन घडते. "पैशा पासरी लिहिणारे झाले, विचारतो कोण! बी. ए. गल्लोगल्ली फिरायला लागले, काय करता इंग्रजी शिकून!"[६] इंग्रजी शिकण्याचे

काय परिणाम होतील. बाळंभटजीने पाटलास सांगितले आहे. केवळ वीस रुपयांच्या चंद्रकळेसाठी बायको हट्ट करते. यावर तुमच्या बायका उलट म्हणतील, 'दोन वेळ पोटभर भाकरी मिळाल्या म्हणजे काही एक नको'. याच्यामुळे शेतकरी हा मीठमिरची खाऊन सुखी आहे. पण ब्राह्मणांना मात्र खमंग भोजनाशिवाय जेवण जात नाही. शेतकरी जमिनीवर फाटके रकटे टाकून त्यावर झोपतो. पण ब्राह्मणांना पलंग, गादी व मच्छरदाणीशिवाय झोप लागत नाही. तूप-पोळीशिवाय जेवण जात नाही. ब्राह्मणांच्या जेवणाची शूद्रांना लज्जत लागू नये म्हणून लोक खरकट्याला सुद्धा शिवू देत नाही. ब्राह्मणांचे खरकटे कुत्रेसुद्धा खात नाही. आमचे इंगित कळू नये म्हणून आम्ही तुम्हाला स्वयंपाकघरात व देवघरात येऊ देत नाही. हे सर्व बाळंभटजीने पाटलाला सांगून झाल्यावर पाटील, आज तुमच्याजवळ बोललो ही गोष्ट बाहेर फुटू देऊ नका. नाहीतर सर्व ब्राह्मण माझ्यामागे कावळ्याप्रमाणे कावकाव करू लागतील. तुम्हाला शपथ आहे. अशाप्रकारे भालेकरांनी बाळंभटजीचा दुटप्पीपणा उघडकीस आणला आहे. पोथी पुराण ऐकणारांनी पोथीतील वर्णनावर किंचितही शंका घेऊ नका. असे पिनलकोडपेक्षा मोठे कडक कलम ग्रंथाच्या शेवटी घातलेले असते. पिनलकोड जेलखान्यात मरेपर्यंतच ठेवील पण ब्राह्मणांचे पिनलकोड किती जलाल आहे, याची कल्पना स्पष्ट होते.

मोहरममध्ये दगडूभाईच्या डोल्यापुढे वाडवडिलांपासून आम्ही नाचत आलो. चोंगे, शर्बत, शेट खातो. करबल्याहून परत येताना दगडूभाईबरोबर ऊर बडवीत रडत घरी येतो. परंतु धोंडोपंत आमच्यासोबत ऊर बडविण्यास कधीच येत नाही. ब्राह्मण मनुष्याखेरीज इतरांना दोन्ही हाताने कधी नमस्कार करीत नाही. आपली स्वार्थी संधी साधू इच्छिणाऱ्या बाळंभटजीने प्रत्येक गोष्टीला शास्त्राधार आहे हे लोकांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न संवादाद्वारे केला आहे. 'शास्त्राधारा'चा धाक दाखवून सत्यशोधक चळवळ खोटी, निराधार, अशास्त्र आहे हे सांगण्याचा तो प्रयत्न करीत असतो. आमच्या प्रत्येक गोष्टीला 'शास्त्राधार' असतो. शास्त्राधाराशिवाय आम्ही पाण्याचा घोट घेत नाही. हे सिद्ध करण्याचा त्याने प्रयत्न केला आहे. पण या सर्व गोष्टींना यशवंतरावने विरोध केला आहे. शास्त्राधार हा खोटा, लटका, निराधार व निरर्थक असून, लोकांची फसवणूक करणारा आहे. हे यशवंतरावाच्या

प्रदीर्घ वक्तव्यामुळे स्पष्ट होते. ब्राह्मणांना मात्र हवे तसे वागण्याचे स्वातंत्र्य आहे आणि इतरांनी मात्र रुढीच्या पारतंत्र्यात नेहमी गुंतून पडावे हाच ब्राह्मणांचा शास्त्राधार आहे.[६] भटभिक्षुकांचा हा शास्त्राधार याला कसलाही पुरावा नाही, तो निराधार आहे. अज्ञानी लोकांना फसविण्यासाठी त्यांचा शास्त्राधार आहे. या ग्रंथाद्वारे भालेकरांनी पटवून दिले आहे. 'शास्त्राधारा'चा आधार घेण्याऱ्या इतर भटाभिक्षुकांवर कै. रा. व. गोपाळराव हरी देशमुख यांनी आवाज उठविला आहे.[७] भालेकरांनी भटाभिक्षुकांचे पितळ उघडले पाडले आहे. हे खेड्यातील लोकांना समजावे. कारण हे लोक छोट्या गोष्टींकडे दुर्लक्ष करतात. म्हणून खेड्यातील लोक शहाणे व्हावेत यासाठी भालेकरांनी शास्त्राधाराची निर्मिती केली आहे.

**संवादाची भाषाशैली :**

'शास्त्राधारा'चे संवाद प्रमाण मराठी भाषेतून आले आहेत. 'शास्त्राधारा'चे निरर्थकत्व सिद्ध करण्यासाठी संवादाइतकेच व्यक्तिरेखेलाही महत्त्व दिले आहे. प्रदीर्घ वाक्यरचनेमुळे यशवंतरावाच्या संवादात एकटेपणा आढळतो. पण या संवादातून भालेकरांची वैचारिक भूमिका स्पष्ट होते. सत्यशोधक चळवळीचा प्रसार व प्रचार करण्यासाठी व समाजाची जागृती व्हावी या हेतूने संवादाची निर्मिती केली आहे. यातील संवाद सामाजिक जीवनाशी निगडीत आहे. व्यवहारी जीवनातील घटना-प्रसंग भालेकरांनी आपल्या संवादाच्या माध्यमातून उभे केले आहे. समाजप्रबोधनाची कठोर भूमिका न घेता नाट्यरूप संवादातून लोकांच्या दोषावर बोट ठेवले आहे. आपले तत्वविचार समर्पक दाखले, कथा, म्हणी, अभंग यांचा वापर करून पटवून दिले आहेत. त्याचबरोबर वाक्प्रचार, जोडशब्द यांचा वापर केला आहे. संवादातील व्यक्तिरेखा ग्रामीण भागातील आहेत. दैनंदिन व्यवहारातील विविध वृत्ती-प्रवृत्तीचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या आहेत. व्यक्तिरेखेच्या तोंडून बोली भाषेचा वापर केला आहे.

**सारांश :**

कृष्णराव भालेकरांचे 'शास्त्राधार' नावाचे छोटे संवादात्मक पुस्तक आहे. या पुस्तकातून भटभिक्षुकांनी खेड्यापाड्यातील लोकांना 'शास्त्राधारा'चा धाक दाखवून गुरफटून

ठेवले होते. त्यामुळे या अज्ञानी लोकांनी 'शास्त्राधारा'चा खूप बाऊ केला होता. या बाऊचे खरे स्वरूप लोकांना समजावे हा आशय या प्रबोधनपर संवादातून व्यक्त होतो. प्रत्येक गोष्टीला शास्त्राधार असतो. हे पटवून देण्यासाठी शास्त्राधार निर्माण केले. यातून कोणतीही गोष्ट करायला ब्राह्मणांना शास्त्राधार आहे. मात्र इतर लोकांना शास्त्राधार नाही. आपली पोटाची तुंबडी भरण्यासाठी भटभिक्षुकांनी भोजने व दक्षिणा उकळण्यासाठी शास्त्राधार निर्माण केला. कोणतेही शारीरिक श्रम न घेता सर्व मालमत्ता घरात येण्यासाठी ब्राह्मणांनी शास्त्राधार तयार केला. स्वार्थी, मतलबी भटभिक्षुकांनी आपले हित साधण्यासाठी शास्त्राधाराचा आधार घेतला आहे. यानंतर सोवळ्याच्या कल्पनेतील फोलपणा भालेकरांनी निदर्शनास आणून दिला आहे.

अशाप्रकारे बाळंभटजीने घेतलेले आक्षेप व यशवंतरावांनी दिलेली उत्तरे, यामधून त्या काळात सत्यशोधक चळवळीवर कोणते आरोप केले जात होते. याचेही दर्शन घडले आहे. हे आक्षेप कसे निराधार आहेत. हे यशवंतरावांच्या प्रदीर्घ वक्तृत्वामुळे लक्षात येते. वैचारिक पातळीवरून लिहिलेल्या संवादातून पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या रुढी-परंपरा हे म्हणी, कथा, समर्पक दाखले, अभंग ह्या उदाहरणांद्वारे पटवून दिले आहे.

**'निराश्रित हिंदु आणि ब्राह्मण क्षत्रिय':**

इ. स. १९०२ मध्ये कृष्णराव भालेकर यांनी 'निराश्रित हिंदु आणि ब्राह्मण क्षत्रिय' हे पुस्तक लिहिले. या पुस्तकाच्या प्रस्तावनेमध्ये भालेकरांनी म्हटले आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे एका कुटुंबातील चार भाऊ आहेत. वडिलार्जित मालमत्तेस चौघे भाऊ सारखे वारस असून, दोघा मोठ्या भावांनी धाकट्या दोघा भावांना मनुष्याधिकाराचा व संपत्तीचा कितवा हिस्सा दिला आहे, याची कितपत काळजी घेतली आहे किंवा किती हाल केले आहेत?[८] याचे वर्णन या पुस्तकातून केले आहे. त्याचबरोबर निराश्रित हिंदूना ब्राह्मण क्षत्रियांनी मदत करावी हे देखील भालेकरांनी अत्यंत तळमळीने सुचविले आहे.

भालेकरांच्या मते, धर्मग्रंथ व धर्ममतांची ऐक्यता ठेवणाच्या कामी ब्राह्मणांनी दुर्लक्ष केले होते. याचे कारण ब्राह्मणांनी आपल्या स्वार्थासाठी कल्पित कथा रचल्या आहेत.

त्यामुळे या सर्व गोष्टींना ब्राह्मण जबाबदार आहेत. निराश्रित हिंदु लोकांना ज्ञान देण्यासाठी स्वत: खर्च करून व कष्ट घेऊन केले तर तुम्ही 'कल्याणेच्छु' आहोत असे समजले जाईल. त्यासाठी त्यांना सोने, चांदी, मोती, अन्न वगैरे काही देऊ नका. यांना फक्त 'विद्या द्या' हा उपाय भालेकरांनी सुचविला आहे.

''निराश्रित हिंदूंना ज्ञानी करण्यासाठी ब्राह्मण क्षत्रियानी ऐहिक सुखाचा सर्वस्वी त्याग करावा. ऐहिक सुख हिंदूच्या स्वाधीन करून अरण्यात जाऊन तपश्चर्या करावी. ब्राह्मणांच्या तपश्चर्येने या देशात पुन्हा पेशवाई येईल. रोजची एक लक्ष ब्राह्मणांची पंगती उठू लागतील. त्यामुळे प्रत्येक ब्राह्मणांस ओगराळ्याने दक्षिणा मिळू लागेल. असे परिणाम भालेकरांनी सडेतोडपणे व्यक्त केले आहेत. ब्राह्मणांनी पेशवाईची गादी स्थापन करून पुण्यास शंभर वर्षे राज्य केले. पण निराश्रित हिंदूसाठी काहीही केले नाही. कारभारांत गुंतल्यामुळे व वरचेवर लढाया चालू असल्यामुळे रयतेच्या सुख-दु:खाकडे पाहण्यास वेळ मिळत नाही. असे म्हणणाऱ्यांना भालेकर खडसावून जाब विचारतात. रोज ब्राह्मण भोजने घालण्यास कसे फावत होते तेथे स्वजातींना कोणीकडून सधन करून सोडावयाचे म्हणून? असे भालेकरांनी एकाचढ एक प्रश्न विचारले आहेत. पेशवाईप्रमाणे हल्लीची हिंदु संस्थाने आहेत. संस्थानिक आपल्या प्रजेस संस्थांनाच्या खजिन्याचा लाभ मिळू देत नाही. संस्थानिकांतील खजिना सर्व जाती व धर्माच्या प्रजेकडून गोळा होतो. त्या त्या खजिन्याचा उपयोग फक्त जातभाईस केला जातो. निराश्रित हिंदूसाठी काहीही केले जात नाही. अशाप्रकारे जातीभेद करणाऱ्या संस्थानिकांचे वर्णन भालेकरांनी केले आहे.

या पुस्तकात हिंदूधर्मातील जेवढे संत होऊन गेले त्या सर्वांनी 'ईश्वर एक व मनुष्यप्राणी एक', असे सांगितले आहे.ही तत्वे इतर धर्मात राहिली. पण हिंदु धर्मात वाढतच गेली. हा बदल घडवून आणण्यास भालेकरांच्या मते ब्राह्मण व क्षत्रिय कारणीभूत आहेत. पुष्कळांनी हा विचार वाढवून 'धर्माचा धंदा' समजून त्यावर संसार सुरू केला. यासाठी भालेकरांनी ब्राह्मण क्षत्रियांना जाब विचारला आहे.

१) तीर्थाची ठिकाणे आणि तेथील ढोंगे किती वाढले आहेत? २) देवस्थानाच्या आधारे किती पुजारी पोटे भरतात? ३) अनुष्ठाने, पुराणे, शकून, अपशकून यांचा धंदा किती वाढला आहे?[९] हे तीन प्रश्न विचारून भालेकरांनी ब्राह्मण क्षत्रियावर ताशेरे ओढले आहेत.

**राजे लोकांचे ऐषआराम :**

'निराश्रित हिंदु आणि ब्राह्मण क्षत्रिय' या पुस्तकात राजे लोकांच्या ऐषआरामावर भालेकरांनी प्रकाश टाकला आहे.[१०] भालेकरांच्या मते, राजाच्या ऐषआरामासाठी जनानखाना एक मोठे खाते ब्राह्मणांनी निर्माण केले. या राजे लोकांना मादक पदार्थांचे व्यसन लावण्याचे काम ब्राह्मणच करीत आले आहेत. म्हणून काही राजे दुवर्तनी बनले. याचा त्रास राजे लोकांना होऊ लागला की, ब्राह्मण मंडळी तेथे जाऊन हा ग्रहपिडा प्रकार आहे असे सांगतात. यासाठी ग्रहशांती करा असा उपाय सुचवितात. यावर ब्राह्मण मंडळी अनुष्ठान व जपाच्या कामाची तयारी करत असत. हजारो ब्राह्मणांस मिष्ठान्ने खाण्यास मिळावित असा त्यामागे उद्देश होता.

हिंदुस्थानात देवळे, घाट बांधण्यात व तेथील पुजारी मंडळींची कुटुंबे पोसण्यात राजे लोकांनी कोट्यावधी रुपयांच्या नेमणुका केल्या. यातून निराश्रित लोकांसाठी कवडीही खर्च केली नाही. इ. स. १८७७ साली पुण्यास व इतर तीर्थाच्या ठिकाणी दुष्काळात अन्नसत्र घातले होते. त्या अन्नसत्रात फक्त ब्राह्मणांनाच पोटभर जेवण मिळत होते. पण निराश्रित हिंदूंची याउलट स्थिती होती. ब्राह्मणांच्या खरकट्या अन्नास स्पर्श करण्यासही त्यांना बंदी होती. काहीजण श्रीमंतांच्या घोड्याच्या लिदीतील चणे वेचुन खात, तर कोणी फुगलेली पोटे चोळीत व ढेकर देत, तर काहींना काही न मिळाल्यामुळे खाण्यास द्या असे म्हणत होते. अशा भयानक स्थितीचे वर्णन भालेकरांनी केले आहे.

राजांचे ऐषआराम व ब्राह्मणांचे मतलब यासाठी प्रजेच्या पैशाची उधळपट्टी ब्राह्मण व क्षत्रिय अधिकाऱ्यांनी किती केली. याचा विचार निराश्रित हिंदूनी करू नये असे भालेकरांनी म्हटले आहे. ब्राह्मणांनी कोणताही गुन्हा केल्यास त्यांना सौम्य शिक्षा किंवा माफ केले जाई. पण तोच गुन्हा निराश्रित हिंदूनी केला तर त्याला कठोर शिक्षाच केली जात असे. याची

जाणीव भालेकरांनी निराश्रित हिंदूना करून दिली आहे. निराश्रित हिंदूंना शहाणे करण्यासाठी व त्यांची सुधारणा घडवून आणावी यासाठी हा विचार या पुस्तकातून मांडला आहे.

भालेकरांची लेखणी ओजस्वी रुप धारण करते. ब्राह्मण क्षत्रियांनी निराश्रित हिंदूंवर केलेल्या अन्यायाची वर्णने मनाला चटका लावणारी आहेत. पेशवाईतील भोजने व दक्षिणा ही वर्णने वाचून आजही मनात संताप निर्माण होतो. हे वर्णन भालेकरांनी मोजक्या शब्दांत केले आहे. भालेकरांनी आपले वैचारिक लेखन साध्या,सोप्या शब्दांत मांडले आहेत. ते वाङ्मयीन वैशिष्ट्यांनी ओतप्रेत भरलेले आहे.

**सारांश :**

इ. स. १९०२ मध्ये भालेकरांनी 'निराश्रित हिंदु आणि ब्राह्मण क्षत्रिय' हे पुस्तक लिहिले आहे. भारतीय समाजव्यवस्थेत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र ही चातुर्वर्ण व्यवस्था आहे. ब्राह्मण व क्षत्रिय हे हिंदु लोकांचे पुढारी आहे. तर वैश्य व शूद्र हे निराश्रित हिंदू होय. या निराश्रितांना मानवी अधिकाराची जाणीव करून देऊन ब्राह्मण क्षत्रियांनी कोणत्या मार्गाने उतराई झाले पाहिजे. याबाबत विचार मांडले आहेत. तर राजे लोकांच्या ऐषआरामावर भालेकरांनी प्रकाश टाकला आहे.

कृष्णराव भालेकरांनी 'शंकराचार्य काय करून असतात?', 'तेलगू तरुणास उद्देशून' व 'ब्राह्मणावर रागावण्याची कारणे' हे निबंध लिहिले आहेत –

**१) शंकराचार्य काय करून असतात? :**

अद्वैत मताचे स्वीकार करणारे जगद्गुरु शंकराचार्य हे ब्राह्मणांचे गुरु आहेत. भालेकरांनी 'शंकराचार्य काय करून असतात?' हा प्रश्न प्रस्तुत निबंधात उपस्थित केला आहे. पूर्वी राजे लोक प्रजेकडून दापदडप करून धन वसूल करत होते. या राजे लोकांच्या मार्फत जगद्गुरुस मोठ्या जहागिऱ्या मिळत असत. त्याचबरोबर हिंदु प्रजेकडून धन वसूल केले जाई. हे उत्पन्न ते एकटेच खात नसत तर ब्राह्मणांचाही सहभाग असे. पण हिंदूच्या कल्याणासाठी मात्र काही केले जात नव्हते. प्रजेपासून वसूल होणाऱ्या द्रव्याचा खर्च प्रजेच्या संमतीने व्हावा. हे तत्व इंग्रज लोकांच्या आगमनानंतर माहित झाले. जग निर्माण होताना

शंकराचार्य व ब्राह्मणांनी परमेश्वराकडून सर्व हिंदु शिष्यांच्या जीवितांचे ऐहिक व पारमार्थिक कुलमुखत्यार जे ब्राह्मण करतील त्यावर अवलंबून होते. त्यामुळे हिंदु प्रजेची परवानगी घेण्याचे काही उरत नव्हते. हे उदाहरण पटवून देण्यासाठी शेतकऱ्याप्रमाणे धर्मगुरु आपल्या हिताचा विचार करतात. हे निबंधातून सांगितले आहे.

त्याप्रमाणे परमेश्वरालाही गुरुशिष्यांच्या कोणत्याही बाबतीत ढवळाढवळ करण्याचा अधिकार नाही. कारण परमेश्वराने या गुरुमंडळींना भूदेवपणाची वस्त्रे व अधिकार पत्रे स्ही शिक्क्यांनिशी ऋषींच्या साक्षीने दिली आहेत. त्यामुळे पुष्कळ लोकांनी कुलमुखत्यारपणा विरूद्ध परमेश्वराकडे तक्रारी केली. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. परंतु परमेश्वराने या लोकांना सांगितले, ''जोपर्यंत तुम्ही कुलमुखत्यारांच्या जहागिरी देशात रहात तोपर्यंत तुमच्या अर्जाचा विचार करणे माझ्याकडे नाही!''. म्हणून तुम्ही माझ्याक्डे अर्ज करू नका. यासाठी तुम्ही धर्मगुरुंकडे दाद मागितली पाहिजे. यावरून असा प्रश्न निर्माण होतो की, परमेश्वराची मुखत्यारपत्रे शंकराचार्यांच्या नावाची आहेत का? अशी शंका लोकांनी घेतली. परंतु ''परमेश्वराच्या सनदेत याचा खुलासा नाही. तर 'शंकराचार्य आणि ब्राह्मण' हे एकच समजले पाहिजे. म्हणूनच भालेकर विचारतात, 'ते सर्व काय करून असतात'. परमेश्वराच्या सनदा आम्ही वाचीत असताना किंवा त्याचा अर्थ सांगत असताना अन्य हिंदु लोकांनी म्हणजे आमच्या प्रजेतील कोणत्याही मनुष्याने कोणत्याही प्रकारच्या शंका घेऊ नयेत. विचारपूस करू नये... किंवा आमच्या समक्षासमक्ष वाटाघाट करू नये. केल्यास त्याला व त्याच्या पुढे गेलेल्या ४२ पूर्वजांना आणि मागून येणाऱ्या ४२ पिढ्यांना नरकात लोटून देण्याबद्दल एकदम परमेश्वराकडे हुकूम सोडू''.[१२] अशा जबर धाकात ठेवले होते. त्यामुळे त्यांची प्रगती झाली नाही. म्हणून भालेकर धर्मगुरुस प्रश्न विचारतात –

१) देवाने तुम्हास देवपणा किती दिवसांचा दिला आहे?

२) देवाने तुमची कोणती यो ग्यता पाहून देवपणा दिला आह?

३) ब्राह्मणेत्तर हिंदु लोकांची या शंभर वर्षात धर्मासंबंधी कोणती सुधारणा केली?

४) पहिले शंकराचार्य स्थापन झाल्यापासून आतापर्यंत ब्राह्मणेत्तर वर्गास काय काय शिकविण्यात आले?[१३] या निबंधातून मार्मिक सवाल विचारून शंकराचार्यांविरूद्ध भालेकरांनी तक्रार केली आहे.

**२) तेलगू तरुणास उद्देशून :**

'तेलगू तरुणास उद्देशून' या निबंधातून उपदेश केला आहे. ब्राह्मणेत्तरास 'अज्ञानी व दारिद्र्य' हे रोग ब्राह्मणांच्या मनुस्मृती नामक पीनल कोडापासून जडला आहे.[१४] मनुस्मृतीमध्ये जे सांगितले आहे ते सर्व सत्य मानून ब्राह्मण शिकले व ब्राह्मणेतर अज्ञानी राहिले. त्यामुळे ब्राह्मणेत्तरांवर अन्याय झाला. याचाच गैरफायदा या भटभिक्षुकांनी घेतला. अशाप्रकारे अन्यायाचे, पक्षपाताचे, जुलमाचे फायदे येऊ दिले कसे? त्यांचे ग्रंथ वाढू कसे दिले? हे प्रश्न भालेकरांनी पोटतिडकीने विचारले आहेत. भालेकरांच्या मते इतकी वर्षे अन्याय सहन केला तो आपण व्यक्त करू शकलो नाही. पण इंग्रज लोकांच्यामुळे देशात शांतता प्रस्थापित झाली. शिक्षणाचा प्रसार झाला. शिक्षणाने मनुष्यास अन्यायाविरूद्ध लढण्याचे सामर्थ्य मिळते. म्हणून 'अनाथपणा' वाढविणाऱ्या 'अनाथफंड संस्था' स्थापण्याऐवजी अज्ञानपणा घालविणारे शिक्षण सर्वांना दिले पाहिजे असे भालेकरांनी म्हटले आहे. अनाथपणा दूर करून सर्वांना शिक्षण मिळेल याची काळजी तेलगू तरुणांनी घेतली पाहिजे. हा उपदेश फक्त तेलगू तरुणांसाठी नसून सर्व तरुणांसाठी भालेकरांनी केला आहे.

या निबंधातून तेलगू तरूणाची शिक्षण संस्था असूनही त्यांनी 'अनाथ फंड' नावाची स्थापना केली. खरे पाहता या शिक्षण संस्थेने अज्ञानी, अशिक्षित लोकांना शिक्षण दिले पाहिजे.[१५] लोकांचा अज्ञानपणा नष्ट झाला तर 'अनाथपणा' ही नष्ट होईल. हे तत्कालीन परिस्थितीचा विचार करता हे भालेकरांनी ओळखले होते. येथे भालेकरांचा तेलगू तरुणांबद्दल जिव्हाळा, आपुलकी स्पष्ट होते. हे भालेकरांनी मूलगामी विचार मांडले आहेत. समाजातील सर्व तरुणांस अज्ञान व दारिद्र्य येण्यास जबाबदार घटकांची भालेकरांनी कारणमिमांसा केली आहे.

### ३) ब्राह्मणांवर रागावण्याची कारणे :

'ब्राह्मणांवर रागावण्याची कारणे' हा भालेकरांचा निबंध आहे. भालेकरांच्या मते, स्वार्थी, ढोंगी ब्राह्मणांनी आपला मतलब साधण्यासाठी बहुजन समाजास अज्ञानी ठेवले. त्यांचे आर्थिक व धार्मिक शोषण केले. त्यांना अपमानाची वागणूक दिली जात असे. बहुजन समाजाच्या या दयनीय अवस्थेस ब्राह्मण जबाबदार आहेत म्हणून ब्राह्मणेत्तर लोक ब्राह्मणांवर रागावले आहेत. हे भालेकरांनी या लेखातून स्पष्ट केले आहे. त्यांनी पेशवाईची मुस्लिम व इंग्रज राजवटीशी तुलना केली आहे.

या देशात मुसलमान व इंग्रज आल्यामुळे ब्राह्मणेत्तरांना 'मानवी हक्क कळू लागले'. त्यापूर्वी ब्राह्मणेत्तरास मानवी हक्क माहित नव्हते. या मानवी हक्कांप्रमाणे त्यांना वागणूक दिली जात नव्हती. पण मुसलमान लोक कोणताही भेदभाव न करता सर्वच लेकरे परमेश्वराची मानत असत. इंग्रज किंवा मुसलमान यांच्यापैकी आम्हीच खुदा आहोत, असे कोणी म्हटले नाही. आमचीच तुम्ही पूजा करीत जा. आमच्याच पायावर डोके ठेवीत जा. तसेच आम्ही तुमच्या पित्याच्या जागी आहोत. तुमच्या मृत पित्यास उपभोगार्थ जे काही द्यावयाचे ते आम्हास द्या, म्हणजे तुमच्या पित्यास पोहोचल्याप्रमाणे आहे. अशी इच्छा त्यांनी कधीही व्यक्त केली नाही. ब्राह्मणेत्तरांना शिक्षण तर नव्हतेच पण धर्मग्रंथ वाचण्यासही बंदी होती. हे ग्रंथ जर कोणी वाचले तर त्याच्या तोंडात शिसे ओतले जाई, जिव्हा काढली जायची, तेलाच्या कढईत ढकलले जात असे. अशा कठोर शिक्षा मुसलमान व इंग्रज राजवटीत केल्या जात नव्हत्या. यां उलट मुसलमान व इंग्रज यांच्या काळात मुले, पुरुष, स्त्रियांना शिक्षण मिळू लागले. तर पेशवाईत ब्राह्मणांनी प्रजेस शिक्षण मिळावे यासाठी काडीमात्र प्रयत्न केला नाही. उलट ब्राह्मणांनी हिंदु लोकांना मुद्दाम अज्ञानी ठेवले होते. हे भालेकरांनी निबंधातून व्यक्त केले आहे.

पेशवाईच्या काळात ब्राह्मणेत्तरांना देवालयात बसण्यास सक्त मनाई होती. पण मुसलमान राजवटीत सर्वांना मोकळीक होती. ब्राह्मण लोक स्वत:स 'मूर्तिमंत ज्ञानाचे भांडार', 'धर्माची मूर्ती', असे समजत होते. ब्राह्मणेत्तरांना मात्र बेडूक, सरडा, पाल या

क्षूद्रजीवाएवढी ही त्यांना किंमत देत नसत. ब्राह्मण स्वत:ला 'पुण्यवृक्ष' व 'ज्ञानदीप' समजत असत. त्यामुळे त्यांची हत्या करणे पाप मानले जाई. ब्राह्मणेत्तरांनी नियमभंग केल्यास त्याला मृत्यूदंडाची शिक्षा केली जात असे. याची साक्ष म्हणून भालेकरांनी पुण्यामधील कुंभार वेशीच्या धरणाजवळ मारुतीचे छोटेसे मंदिर जमिनीत आहे.[१६] हे उदाहरण दिले आहे. ब्राह्मणेत्तरांच्यावर मुसलमान व इंग्रज राजवटीत असा छळ झाला नाही. आपला मतलब साधण्यासाठी त्यांनी ब्राह्मणेत्तरांना मरणयातना दिल्या म्हणून ब्राह्मणेत्तर लोक ब्राह्मण मंडळींवर खूप रागावले आहेत. या भालेकरांच्या निबंधातून ब्राह्मणांच्याबद्दल प्रकोप, प्रक्षोभ व तिरस्कार आढळून आला आहे.

**सारांश :**

कृष्णराव भालेकरांचे 'शंकराचार्य काय करून असतात?', 'तेलगू तरुणास उद्देशून' व 'ब्राह्मणावर रागावण्याची कारणे' हे निबंध उपलब्ध आहेत. 'शंकराचार्य काय करून असतात' यामध्ये प्रजेकडून वसूल होणारे उत्पन्न राजे लोक एकटेच खात नसत. तर त्यांच्याबरोबर शंकराचार्य व ब्राह्मणमंडळी खाऊ लागत नसे. प्रजेकडून वसूल झालेल्या द्रव्याचा खर्च त्यांच्या संमतीने न करता आपले मतलब साधण्यासाठी केला जाई. पण प्रजेच्या कल्याणासाठी काही करत नव्हते म्हणून भालेकरांनी शंकराचार्यांना जाब विचारला आहे. देवाने तुम्हास देवपणा किती दिवसांचा दिला आहे? देवाने तुमची कोणती योग्यता पाहुन देवपणा दिला आहे? कोणती योग्यता पाहून देवपणा दिला आहे? ब्राह्मणेत्तर लोकांची कोणती सुधारणा केली? ब्राह्मणेत्तर वर्गास काय काय शिकविण्यात आले? असे वरचढ प्रश्न विचारून शंकराचार्यांना भालेकरांनी चांगलेच धारेवर घेऊन कठोर प्रहार केला आहे.

'तेलगू तरुणास उद्देशून' या निबंधात तेलगू तरुणाची गरीब व अनाथ बनण्याची कारणे भालेकरांनी सांगितली आहेत. तेलगू तरुणांनी गरीब 'अनाथफंड संस्था' काढण्याऐवजी अज्ञान दूर करणारे शिक्षण सर्वांना सक्तीने दिले पाहिजे, व अनाथफंडाला मदत केली पाहिजे याची काळजी तेलगू तरुणांनी घेतली पाहिजे. हे विचार भालेकरांनी व्यक्त केले आहेत.

**भाषणे :**

शेती, शेतकरी, उद्योगधंदे व त्यांचे जीवन याबाबतीत कृष्णराव भालेकरांनी विचार मांडला आहे. इ. स. १९०३ मध्ये 'कारखाने आणि व्यापार चालविणारी शेतकरी मंडळी' व 'शेतकऱ्यांनो डोळे उघडा' ही दोन भाषणे आहेत. या भाषणातून शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासंबंधी अनेक मौलिक विचार स्पष्ट मांडले आहेत. शेतकरी सुधारणेसाठी विचार,उच्चार व आचार या त्रिसूत्रांचा भालेकरांनी वापर केला आहे. अज्ञानाने गांजलेल्या शेतकरी, कामगार, मजूर कारागीरांचे प्राप्त परिस्थितीत हित करण्याचा प्रयत्न भालेकरांच्या जणू रक्तातच भिनला होता. शेती, उद्योगधंदे, शेतकरी, मजूर यांचे जीवन, त्यांच्या जीवनातील रुढी-परंपरा, शिक्षण, अर्थ या बाबींचा भालेकरांनी बारकाईने विचार केला आहे.[१७] याविषयीचे विचार त्यांनी मांडताना, पुण्यातील वेगवेगळ्या पेठांत जाऊन मंगळवारात मंगळवारी, बुधवारात बुधवारी भाषणे देण्यास सुरुवात केली. असा त्यांच्या भाषणांचा लोकांवर प्रभाव पडत असे. शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्याविषयी 'कारखाने आणि व्यापार चालविणारी शेतकरी मंडळी' या भाषणातून भालेकरांनी आपले विचार व्यक्त केले आहेत.

आपल्या देशामध्ये सहकाराचा श्रीगणेशा इ. स. १९०४ मध्ये भारतीय सहकारी कायद्यान्वये झालेला आहे. त्यापूर्वी भालेकरांनी शेतकरी व्यापार व उद्योगधंद्यात पडल्याशिवाय आर्थिकदृष्ट्या तो सबळ होणार नाही. हे भालेकरांनी ओळखून इ. स. १९०२ मध्ये करजगाव येथे शेतकऱ्यांची औद्योगिक कंपनी काढण्याचा धाडसी प्रयत्न केला. उद्योगधंदा करून शेतकऱ्यांनी आपले दारिद्र्य दूर करावे.[१८] या व्यापक उद्देशानेच भालेकरांनी कंपनी स्थापन करण्याचा विचार मांडला आहे.

भारत हा देश कृषि प्रधान आहे. शेतकऱ्यांचे भवितव्य शेतीवर अवलंबून आहे. म्हणून शेतकऱ्यांची स्थिती दिवसेंदिवस फार वाईट होत चालली आहे. कारण आपल्या देशातील शेतकऱ्यांना 'अज्ञान' व 'दारिद्र्य' या भयंकर रोगाने पछाडले आहे. ही वाईट स्थिती दूर करून उत्तम स्थिती प्राप्त करण्यास भालेकरांनी उपाय सांगितला आहे. ते म्हणजे,

''विद्या अणि उद्योग हेच एक मिक्चर काय ते उत्तम होय''.[१९] हे प्राप्त करण्यास शेतकऱ्यांनी आळस करू नये. शेतकऱ्यांसाठी भालेकरांनी विचार मांडले आहेत.

या देशातील संस्थानिक व इंग्रज सरकार यांना वर्षाचे एकूण १०० कोटी उत्पन्न मिळते. तर त्यात शेतकऱ्यांकडून ८० कोटी रुपये मिळतात. पण शेतकऱ्यांच्या पदरात काही पडत नाही. यामुळे शेतकऱ्यांचे दारिद्र्य वाढतच जाते. त्यामुळे शेतकऱ्यांची सुधारणा होत नाही. यामुळे एक दोन पिढ्यानंतर शेतकरी लोक खालावले जातील. याचा परिणाम आपली वतने परकीय लोकांच्या ताब्यात जाण्यास सुरुवात झाली आहे. मात्र आपल्या शेतकऱ्यांना 'अलबत खाली तोंडे करून' त्यांच्या गुरांढोरांजवळ आसवे गाळीत बसावे लागणार, अशा भयानक परिणामांची  जाणीव भालेकरांनी करून दिली आहे. आपले विचार प्रभावीपणे व ठोसपणे मांडले आहेत. ''

भालेकरांनी विद्वान, उद्योगी नवे शेतकरी व अज्ञानी शेतकरी यांच्यातील फरक केला आहे. त्याचबरोबर परकीय लोकांच्या हातात वतने गेल्यानंतर अज्ञानी शेतकऱ्यांच्या नवीन पिढीचा उदरनिर्वाह कसा चालणार याची जाणीव भालेकरांनी करून दिली आहे. ''एकूण काय की नव्या काळाची पावले ओळखणारा, या पावलांखाली कोण कोण चेंगरणार आहेत याची जाणीव असणारा असा हा पुरुष आहे. म्हणूनच पारंपरिक पद्धतीने शेती करणारे हळूहळू शेतीच्या बाहेर ढकलले जातील, असे ते सांगतात. एवढेच नाही तर कृत्रिम डौलात राहणाऱ्या असंख्य शेतकऱ्यांची जमीन इतर व्यावसायिकांनी गिळंकृत केली आहे हे ही ते मोठ्या तळमळीने सांगतात''.[२०] अशाप्रकारे भालेकरांनी आपल्या उणिवा स्पष्ट करून त्यांच्या दु:खस्थितीची कारणमीमांसा केली आहे.

अज्ञानी शेतकऱ्यांतील उणिवा दूर करण्यासाठी भालेकरांनी उपाय सुचविले आहेत. यावर उपाय सांगताना भालेकर म्हणतात, मोठे भांडवल उभारण्यासाठी श्रीमंत लोकांच्या रकमांनी भांडवल उभारले जाते. पण तसे न करता गरीब शेतकऱ्यांना अशा कंपनीत भाग ठेवून भागीदार होता यावे म्हणून १० रुपयांचा भाग ठेवण्यात यावा. म्हणजे कंपनीत अधिक शेतकरी तयार होतील. असे हजार भाग म्हणजे ५० हजार रुपयांचे कंपनीचे भांडवल उभारले

जाईल. यातून शेतकऱ्यांना हळूहळू उद्योगधंद्याची आवड निर्माण होईल. इतर व्यापार करणाऱ्या कारखान्यापेक्षा आपल्या शेतकऱ्यांचे कारखाने फार भरभराटीने चालतील असे भालेकरांनी सांगितले आहे.

शेतकऱ्यांसाठी कंपनी सुरू झाली तर लोक उद्योगधंदे करतील. त्यामुळे लोकांचे आर्थिक शोषण कमी होईल. हा विचार भालेकरांनी स्पष्ट केला आहे. शेकडो परकीय लोक कोट्यावधी रुपयांचा व्यापार गावोगावी करून बसले आहेत. तो व्यापार आपल्या शेतकऱ्यांना सुद्धा सहन करता येईल याची जाणीव भालेकर शेतकऱ्यांना करून देतात. आपण उत्पन्न केलेले जिन्नस व वस्तू याचा व्यापार हे परकीय लोक करतात. शेतकऱ्यांनी शेतीमध्ये राबून व अडचणी सोसून जिन्नस पिकविले जातात. याचा व्यापार आपल्याच देशात, प्रांतात, आपल्या गावी मालाचे कारखाने आणि व्यापार शेती सांभाळून येथेच करावा.[२१] असा भालेकरांनी शेतकऱ्यांना मोलाचा सल्ला दिला आहे.

या देशातील विद्वान व मोठ्या धनवान लोकांनी मोठ्या गावी लहान उद्योगशाळा काढल्या पाहिजेत. या शेतकऱ्यांना योग्य प्रतीचे शिक्षण दिले पाहिजे. त्याचबरोबर उद्योगात उद्योग करणे म्हणजे शेती सांभाळून तिच्या जोडीला छोटे करणे होय. परकीय लोकांच्या ताब्यात चाललेले उद्योग रोखून धरले पाहिजेत. त्यांची उद्योग करण्याची पध्दती स्वीकारली पाहिजे. अनेक व्यक्तीने उद्योग करण्यापेक्षा कंपन्या करून उद्योग करणे हे अधिक योग्य ठरेल. यासाठी 'एकता' व 'बंधूभाव' हे विचार वाढीस लागले पाहिजेत. गावातील वैरपणा सोडून समभावाने वागले पाहिजे. सर्वांनी मिळून एकत्र उद्योग केला पाहिजे. यासाठी अज्ञान, आळस आणि भित्रेपणा सोडून उद्योगास लागले पाहिजे.[२२] हा संदेश भालेकरांनी दिला आहे.

शेतकऱ्यांनी हे काम मनावर घेऊन कंपनी सुरू केली तर दरमहा २५ दिवस जीनचे काम चालेल. असे मानले तरी पाच महिन्यात १२५ दिवस आणि रात्र ४० जीन्स चालू राहिल्यास रोज २०० खंडी कापूस पाच महिन्यांत वटला जाईल. आणि खंडीमागे २ रु. वटणावळ घेतल्यास ५० हजार रु.चे काम होईल. यास २० हजार रुपये खर्च लागेल, असे मानले तरी ३० हजार रु.नफा कंपनीस राहणार आहे. म्हणजे शेकडा ६० रु. नफा राहतो.

म्हणून दिवसरात्र कारखाना चालू राहिल्यास शेतकऱ्याला भरपूर नफा मिळेल. हे भालेकरांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले आहे. निरनिराळ्या लोकांनी धंदा करीत बसण्यापेक्षा अनेक लोकांनी एकत्र येऊन कंपनी घेऊन धंदा करणे यात श्रम, वेळ या गोष्टींची बचत होईल.[२३] अशाप्रकारे भालेकरांनी वेळेचे महत्त्व पटवून दिले आहे.

शेतीबरोबर इतर उद्योगधंदे केल्याशिवाय शेतकऱ्यांना जगता येणार नाही. शेतीची निगडीत असणारे उद्योगधंदे शेतकऱ्यांनी करावेत. उद्योग करण्यासाठी कारखाने काढले पाहिजेत. हा नव्या युगाचा मंत्र त्यांनी दिला आहे. एवढेच नाही तर त्यांनी कारखाने काढण्याचा धाडसी प्रयत्न केला आहे. हे सारेच शंभर वर्षांपूर्वी घडत होते. हे विलक्षण आहे. स्वातंत्र्यानंतर जी सहकार चळवळ सुरू झाली तिचा पाया स्वातंत्र्यापूर्वी पन्नास वर्षे भालेकर यांच्या विचारात, चिंतनात आणि कृतीत दिसू लागला आहे.[२४]

शेतकरी शेतात रात्रंदिवस कष्ट करून धान्य पिकवितात व कर्जापोटी धान्य व्यापाऱ्याला देतात. दुष्काळाच्या काळात त्या धान्याकडे शेतकऱ्यांना बघत बसावे लागते. या काळात शेतकऱ्यांना कोणी वाली नसतो. सरकारला मिळणाऱ्या उत्पन्नातील काहीच रक्कम शेतकऱ्यासाठी खर्च केली जाते. परंतु शेतकऱ्यांनी आता सरकारवर न अवलंबून राहता स्वत:च स्वत:च्या उद्धाराचा प्रयत्न केला आहे, असे भालेकरांनी कळकळीने सांगितले आहे. यासाठी 'शेतकऱ्यांचा धर्मफंड' तयार करावा. यातूनच कंपन्या स्थापन होतील. शेतकरी उद्योगाला लागतील. त्यामुळे शेतकऱ्यांचे धर्मफंड वाढू लागतील व आपल्या उद्योगापासून कोट्यावधी लोकांचे हित होईल, असे विचार भालेकरांनी आपल्या भाषणातून मांडले आहेत. खेड्यापाड्यातून लोक भालेकरांची भाषणे ऐकण्यासाठी येत असत. कधी कधी कामावरील मजुरास तासन्तास उपदेश करीत. त्यामुळे काही युरोपियन लोक अमलदारांना भालेकरांचा गुस्सा येई. पण काही थोर मनाच्या साहेब लोकांनी कृष्णरावास सर्टिफिकेट देताना त्यात त्यांच्या वाक्शक्तीची तारीफही केली आहे.[२५] शेतकऱ्यांची प्रगती झाल्याशिवाय देशाची सुधारणा होणार नाही. हे भालेकरांनी भाषणातून व्यक्त केले आहे.

जोश, आवेश, धारदारपणा हे भालेकरांच्या भाषणामध्ये गुण आढळतात. आपला मुद्दा मोजक्या शब्दांत मांडला आहे. त्याचबरोबर दुसऱ्यांच्या मुद्द्यावर कठोर प्रहार केला आहे.

**शेतकऱ्यांनो डोळे उघडा:**

'शेतकऱ्यांनो डोळे उघडा' हे भालेकरांचे प्रसिद्ध भाषण आहे. या भाषणातून शिक्षणाचे महत्त्व सांगितले आहे. सुरुवातीला इंग्रजी राजवट न्यायी, समतावादी असल्यामुळे आपल्याला शिक्षणाची किंवा प्रगतीची संधी मिळते असे भालेकरांनी म्हटले आहे. इंग्रजी राज्यांची तुलना भालेकरांनी रामराज्याशी केली आहे. रामराज्य हे सुखाचे होते असे नेहमी सांगितले जाते. राम हा न्यायी व विद्वान राजा होता. येथे भालेकरांनी शंबुकवधाच्या कथेची चिकीत्सा केली आहे. शंबुक नावाच्या एका सामान्य माणसाने तप करून ज्ञानी होण्याचा प्रयत्न केला म्हणून रामाने त्याचे मुंडके उडविले. तप करणाऱ्या शंबुकाचा वध करणे ही गोष्ट त्यांना अन्यायी वाटते. म्हणून हे कसले रामराज्य, कोण हा न्याय? असे भालेकर उपरोधाने म्हणतात. रामराज्यात निरपराध शंबुकाचा शिरच्छेद केला गेला. मात्र आता ज्ञान मिळविण्याची संधी आली आहे. आता वाटेल तशी तपश्चर्या करून ध्येयाचा उद्धार करून घेण्यास पूर्ण स्वातंत्र्य मोकळीक मिळाली आहे. पण आपल्याला या स्वातंत्र्याचा उपयोग करून घेता येत नाही.

आपणास 'विद्येचे पाय' व 'उद्योगाचे हात' नसल्यामुळे आपण लंगडे, थोटे होऊन जागच्या जागी पडलो आहोत.[२६] अशा शब्दांत अज्ञान असल्यामुळे आज बहुजन समाजाची प्रगती खुंटली आहे, असे भालेकर म्हणतात. आपल्या मनातील विचार व्यक्त करण्यासाठी भालेकरांनी उदाहरणे दिले आहे. बाहेरून टुमदार दुमजली, दारे, खिडक्या, रुप्याची, सोन्याची कौले अशा घरामध्ये उंदीर, घुशींनी उकिरडा काढला असेल तर काय उपयोग? शेतकऱ्यांची, कष्टकऱ्यांची ही स्थिती कशामुळे झाली आहे? विद्येचा तिसरा डोळा नसल्यामुळे शेतकरी आणि कारागिर, लोहार, पाथरवट, चांभार, कासार वगैरे मंडळींची अशी अवस्था झाली आहे. ''तुम्ही म्हणत असाल की, जे नशीबांत असेल तें होईल. ठीक

आहे. चालूं द्या. तुमच्या नशीबाचे रडगाणें. तुम्ही आपले नशीब भीक मागे कराल तर तें तुम्हाला भीक मागायस लावील, तुम्ही आपलें नशीब उद्योगी बनवाल तर ते तुम्हांस उद्योगी बनवील हें मात्र तुम्ही पक्कें ध्यानात ठेवा. 'नशीब', 'नशीब' करीत बसाल तर तेही तुमच्या छातीवर 'नशीब', 'नशीब' करीत बसेल. दुसऱ्या देशातील लोक नशिबावर खोगीर घालून त्यावर स्वार झाले आहेत, आणि तुम्ही नशिबाला बोकांडी घेऊन बसलां आहांत! मग तुमचे लाडकें नशीब खाली पायीं पायीं चालून तुमचा शीण भाग कशाला हलका करील? आणखी मांडी जमवून तुम्हांवर बळकट बसणार नाही?''[२७] अशाप्रकारे भालेकरांनी दैव ही कल्पना कशी थोतांड आहे हे त्यांना पोटतिडकीने व्यक्त केले आहे. येथे भालेकरांनी परखड भाषा वापरली आहे.

शेतकऱ्यांच्या मनावर नशिबासंबंधीचे विचार बिंबवण्यासाठी 'एका ठग कोल्ह्याची व भोळ्या मेंढराची कथा' सांगितली आहे. कोल्हा भोळ्या मेंढरास तुम्ही लोकांनी गवत खाऊन जगावे व आम्ही कोल्हे मंडळीने गोड व पचेल असे मांस खाऊन दिवस लोटावे. याला कोणाचाही उपाय नाही. तू एवढे जीवाला घाबरू नकोस. जे नशिबात असेल ते होईल. यावर मेंढोबा म्हणाला की, 'तुम्ही नशीब नशीब म्हणता व आम्हास गट्ट करता' यामधून नशीब ही कल्पना अंधश्रद्धेतून निर्माण झाली आहे. याप्रमाणे धूर्त ठगांनी शेतकऱ्यांच्या पाठीवर नशीबाचे खोगीर घालून त्यांना दैववाद, देवपणा या भोळ्या समजुतीत गुरफटून टाकले आहे. या खुळचट समजुतीवर विश्वास न ठेवता आपण स्वत:च प्रयत्न केला पाहिजे. त्याचे फळ तुम्हाला मिळेल हे निश्चयाचे बळ. 'तुका म्हणे तेचि फळ' येथे तुकारामाच्या सुविचाराचा उपयोग केला आहे.

कोणताही विचार न करता आपल्या मुलांना शिक्षण द्या. तर 'तुमची तरुण पिढी शिकेल तर टिकेल', असा भालेकरांनी उपदेश केला आहे. आधुनिक शेतीचे शास्त्रशुद्ध व नवीन तंत्रज्ञानानुसार शिक्षण देणारी शेतकी शाळा प्रत्येक गावामध्ये काढली पाहिजे. शेतकऱ्यांना शेती कशी करायची याचे शिक्षण दिले पाहिजे. पण लोकांचा असा समज झाला की, सर्वांनी शिक्षण घेतले तर शेती कोण करणार? यासाठी भालेकर म्हणतात. मुलांच्या

बरोबरीने मुली शिकू लागल्या तर स्वयंपाक कोण करणार? पण हे पटवून देताना भालेकर म्हणतात, 'उलट शिकलेल्या मुली मीठ मिरची हिशेबात घालून भाजी चवदार बनवितील व घरखर्चाचा हिशेब ही उत्तम ठेवतात. हाच प्रकार शिकलेल्या मुलांच्या सोबत होणार आहे. शिकलेले शेतकरी, शेतकाम हुशारीने करतील. अडाण्या शेतकऱ्यांप्रमाणे दुप्पट राबत बसणार नाहीत'. यातून भालेकरांनी शिक्षणाची व त्यांच्या जबाबदारीची जाणीव भाषणातून करुन दिली आहे.

शेतकऱ्यांना जाणीव करून देताना ते म्हणतात, स्वर्गातील बापाचा निरोप घेऊन, थाप देऊन, गाई, घोडा, दक्षिणा हे ब्राह्मणांना शिकलेल्या लोकांकडून मिळणार नाही. म्हणून भालेकरांनी शेतकऱ्यांना सल्ला दिला आहे. तुम्ही धूर्त ब्राह्मणांच्या थापांना भुलू नका. नशीबाला पोटाशी धरुन आळसात दिवस घालवाल, तर खरोखर तुम्ही पुढील पिढीचा नाश करणारे मूर्ख व निर्दय पूर्वज ठराल! हा परिणाम भालेकरांनी परखडपणे व निस्पृहपणे स्पष्ट केला आहे.

विद्या म्हणजे तिसरा डोळा. जर तुमच्याजवळ विद्या नसेल तर तुमच्या जीवनाला काहीच अर्थ उरत नाही. म्हणून भालेकर म्हणतात, 'विद्या शिका', विद्या हे सर्व सुखाचे बीज आहे. हे सांगताना भालेकरांनी दैनंदिन जीवनातील उदाहरणे दिली आहेत. आपल्या मुलांना शिक्षण देऊन शहाणे करा. यासाठी इंग्रजी राजवट योग्य आहे. इंग्रजी राज्यात समतेचे वारे वाहत होते. याच गोष्टींचा आपण सर्वांनी लाभ घेतला पाहिजे, असे भालेकरांनी निर्भिडपणे शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी विचार मांडले आहेत.

इंग्रजी राज्याशिवाय आपल्या देशाची प्रगती होणार नाही. यावर ते धूर्तांना म्हणतात, ''तुम्ही आजपर्यंत स्वराज्याची पोटभर हवा खाल्ली तेव्हा तुम्हाला पुन: स्वराज्य मिळेल न मिळेल तितके बरे''. आपल्या देशाची स्थिती सुधारायची असे तर इंग्रजी राजवट आवश्यक आहे. कारण शेतकऱ्यांच्या मुला-मुलींना शिक्षण न देणाऱ्या स्वातंत्र्यापेक्षा इंग्रजी राजवट बरी! आणि याचाच फायदा घेऊन शेतकऱ्यांनी आपल्या मुलांच्या गळ्यात 'विद्यारुपी' जादूचा ताईत बांधला पाहिजे'', असे भालेकरांनी जाणीवपूर्वकतेने सांगितले आहे. यासाठी

''आपआपल्या गांवीं विद्येचे एकेक देऊळ बांधा, एकेक चांगला पुजारी ठेवा व आपलीं सर्व मुलें त्या देवळात बसवून देवीची भक्ती एकनिष्ठपणें करून घ्या. मग हिच ती अष्टभूजा नव्हे अनंतभूजा अज्ञानमर्दिनी भगवती विद्यांबा प्रसन्न होईल, तुमचा उद्धार करील.''[२८] अशा शब्दांत विद्येचे महत्त्व पटवून दिले आहे.

अशाप्रकारे भालेकर हे मूलत: धाडसी स्वभावाचे होते. अडाणी, अशिक्षित शेतकऱ्यांचे डोळे उघडण्यासाठी भालेकरांनी 'भाषणे' या प्रभावी माध्यमांचा परिणामकारक उपयोग केला आहे. शेतकऱ्यांचे दु:ख भालेकरांनी समजावून घेतले आहे. त्यांच्या हिताचा, सामाजिक जीवनाचा विकास कसा होईल यांची तर्कसंगत मांडणी भालेकरांनी केली आहे.

**भालेकरांची लेखन शैली :**

कृष्णराव भालेकरांची लेखन शैली तत्कालीन शैलीपेक्षा वेगळीच आहे. त्यांची वर्णनशैली, संवादत्मकता, प्रसंगी येणारा उपहास, उपरोध, परखडपणा, निर्भिडता हे त्यांच्या लेखन शैलीची वैशिष्ट्ये आहेत. एखादा प्रसंग शैलीदार पद्धतीने परिणामकारक करण्यासाठी हातोटी भालेकरांना चांगलीच साधली आहे. भालेकरांचे विचार उदात्त व शाश्वत मानवी मूल्यांनी भरलेले आहेत. जोश, आवेश, धारदारपणा, सोपेपणा थोडक्या शब्दांत आपला मुद्दा प्रभावीपणे मांडणे, त्याचबरोबर दुसऱ्यांच्या मुद्यांवर अचूक प्रहार करणे हे सर्व गुण त्यांच्या लेखनशैलीचे आढळतात. श्रोत्यांना आपल्या कळकळीने आपलेसे करून घेणे, त्यांना अधून मधून साद घालणे, त्यांना पटतील अशी समर्पक उदाहरणे मधून मधून देणे या सर्व गोष्टींमध्ये भालेकरांचे वक्तृत्व सर्वांनाच प्रभावी वाटत असे. समर्पक म्हणी, कथा, दाखले, अभंग, व्यवहारी जीवनातील उदाहरणे देऊन भालेकरांनी जनसामान्यांशी सुसंवाद साधला आहे. हे त्यांच्या लेखनशैलीवरून स्पष्ट होते.

**सारांश :**

'भाषणे' या प्रभावी माध्यमांचा कृष्णराव भालेकरांनी उपयोग केला आहे. शेतकऱ्यांच्या दु:खाला वाचा फोडण्याचे कार्य भालेकरांनी केले आहे. इ. स. १९०३ मध्ये 'कारखाने आणि व्यापार चालविणारी शेतकरी मंडळी' व 'शेतकऱ्यांनो डोळे उघडा' या

भाषणातून अनुक्रमे व शेतकऱ्यांची दु:खस्थिती या विषयीचे कारणे, परिणाम व उपाय सुचविले आहेत.

'कारखाने आणि व्यापार चालविणारी शेतकरी मंडळी' व 'शेतकऱ्यांनो डोळे उघडा' ही दोन भाषणे उपलब्ध आहेत. शेतकऱ्यांच्या दु:खाची कारणे सांगून त्याचे परिणाम व त्यावर उपाय सुचविले आहेत. शेतकऱ्यांच्या स्थितीला कारणीभूत असणारे घटक म्हणजे 'अज्ञान व दारिद्र्य' होय. या भयानक रोगाने शेतकऱ्यांना पछाडले आहे. शेतकऱ्यांची वाईट स्थिती दूर करण्यासाठी त्यावर 'विद्या आणि उद्योग' हे उपाय सुचविले आहेत. यासाठी शेतकऱ्यांना प्रत्येक गावी शाळा काढून उद्योगधंद्याचे शिक्षण दिले पाहिजे. त्याचबरोबर सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येऊन कंपनी स्थापन करावी असा भालेकरांनी उपदेश केला आहे. अशाप्रकारे भालेकरांनी शेतकऱ्यांच्या उणिवा सांगून त्यांच्या दु:खस्थितीची कारणमीमांसा केली आहे.

'शेतकऱ्यांनो डोळे उघडा' हे भालेकरांचे प्रसिद्ध भाषण आहे. या भाषणातून विद्येचे महत्त्व स्पष्ट केले आहे. इंग्रजी राज्याची तुलना भालेकरांनी रामराज्याशी केली आहे. इंग्रजी राज्यात शिक्षणाची संधी होती. पण रामराज्यात सर्वांना शिक्षण उपलब्ध नव्हते. म्हणून भालेकरांनी रामराज्याची चिकित्सा केली आहे. शंबुक वधाच्या कथेवर भालेकरांनी टीका केली आहे. 'विद्येचे पाय' व 'उद्योगाचे हात' नसल्यामुळे शेतकऱ्यांची अशी स्थिती झाली आहे. हे भालेकरांनी विविध उदाहरणांद्वारे पटवून दिले आहे. भालेकरांच्या भाषणांतून उपरोध, उपहास परखडपणा व निर्भिडता स्पष्ट होते.

**उपसंहार :**

चौथ्या प्रकरणामध्ये कृष्णराव भालेकर यांच्या वैचारिक गद्याचा अभ्यास केलेला आहे. यामध्ये वैचारिक ग्रंथ, निबंध व भाषणे यांचा समावेश होतो. भालेकरांनी 'शास्त्राधार' व 'निराश्रित हिंदु व ब्राह्मण क्षत्रिय' हे दोन वैचारिक ग्रंथ लिहिले आहेत. 'शंकराचार्य काय करून असतात?', 'तेलगू तरुणास उद्देशून' व 'ब्राह्मणांवर रागवण्याची कारणे' हे निबंध

उपलब्ध आहेत. 'कारखाने आणि व्यापार चालविणारी शेतकरी मंडळी' व 'शेतकऱ्यांनो डोळे उघडा' या दोन भाषणांचा समावेश केला आहे.

कृष्णराव भालेकरांनी 'शास्त्राधार' नावाचे छोटे संवादात्मक पुस्तक इ. स. १९०८ मध्ये लिहिले. प्रश्नोत्तरात्मक संवाद पद्धतीचा वापर केला आहे. बाळंभटजीने घेतलेले आक्षेप व यशवंतरावांनी दिलेली उत्तरे यामधून त्या काळात सत्यशोधक चळवळीवर कोणते आरोप केले जात होते याचेही दर्शने घडले. हे आक्षेप कसे निराधार आहेत ही उदाहरणे देऊन भालेकरांनी स्पष्ट केले आहे. वैचारिक पातळीवरून लिहिलेल्या चटकदार संवादातून पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या रुढी-परंपरा, रितीरिवाज यातील फोलपणा विविध उदाहरणांद्वारे पटवून दिला आहे.

भालेकरांनी 'निराश्रित हिंदु आणि ब्राह्मण क्षत्रिय' हे पुस्तक इ. स. १९०२ मध्ये लिहिले. भारतीय समाजव्यवस्था ही चातुर्वर्ण्यावर आधारलेली आहे. या चातुर्वण्यात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांचा समावेश आहे. ब्राह्मण व क्षत्रिय हे हिंदु लोकांचे पुढारी आहेत. तर वैश्य व शूद्र हे 'निराश्रित हिंदू' होय. या 'निराश्रितांना मानवी अधिकारांची जाणीव करून देऊन ब्राह्मण क्षत्रियांनी कोणत्या मार्गाने उतराई झाले पाहिजे', याबाबत विचार मांडले आहेत. तर राजे लोकांच्या ऐषआरामावर प्रकाश टाकला आहे. 'शंकराचार्य काय करून असतात?' या मधून मार्मिक सवाल विचारून शंकराचार्याविरूद्ध भालेकरांनी तक्रार केली आहे. तर 'तेलगू तरुणास उद्देशून' यामधून अज्ञानपणा वाढविणाऱ्या 'अनाथफंड' संस्था स्थापण्याऐवजी अज्ञानपणा घालविणारे शिक्षण सर्वांना दिले पाहिजे. असा उपदेश तेलगू तरुणांना केला आहे. 'ब्राह्मणांवर रागावण्याची कारणे' या लेखातून ब्राह्मणांनी आपला स्वार्थ साधण्यासाठी बहुजन समाजास अज्ञानी ठेवले आहे. या दयनीय अवस्थेस ब्राह्मण जबाबदार आहेत. ही वस्तुस्थिती उघड करून दाखविली आहे. बहुजन समाज यांचे तुलनात्मक हृदयद्रावक वर्णन भालेकरांनी केले आहे. आपले विचार निर्भिड व परखडपणे ठोस पुराव्यासहित मांडण्याचा प्रयोग केला आहे.

कृष्णराव भालेकरांची भाषणेही उपलब्ध आहेत. 'भाषणे' या प्रभावी माध्यमांचा उपयोग भालेकरांनी केला आहे. शेतकऱ्यांच्या दु:खाला वाचा फोडण्याचे कार्य भालेकरांनी केला आहे. इ. स. १९०३ मध्ये 'कारखाने आणि व्यापार चालविणारी शेतकरी मंडळी' व 'शेतकऱ्यांनो डोळे उघडा' या भाषणातून अनुक्रमे कंपनीसंबंधी व शेतकऱ्यांची दु:खस्थिती याविषयीचे कारणे, परिणाम व उपाय सुचविले आहेत.

'कारखाने आणि व्यापार चालविणारी शेतकरी मंडळी' या भाषणातून शेतकऱ्यांच्या दु:खस्थितीला कारणीभूत असणारे घटक म्हणजे 'अज्ञान' व 'दारिद्र्य' होय. या भयानक रोगाने शेतकऱ्यांना पछाडले आहे. शेतकऱ्यांची वाईट स्थिती घालविण्यासाठी त्यावर 'विद्या आणि उद्योग' हे उपाय सुचविले आहेत. यासाठी शेतकऱ्यांनी प्रत्येक गावी शाळा काढून उद्योगधंद्याचे शिक्षण दिले पाहिजे. त्याचबरोबर सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येऊन कंपनी स्थापन करावी असा भालेकरांनी उपदेश केला आहे. अशाप्रकारे भालेकरांनी शेतकऱ्यांच्या उणिवा सांगून त्यांच्या दु:खस्थितीची कारणमीमांसा केली आहे.

'शेतकऱ्यांनो डोळे उघडा' हे भालेकरांचे प्रसिद्ध भाषण आहे. या भाषणातून शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करतात. इंग्रजी राज्याची तुलना भालेकर रामराज्याशी करतात. इंग्रजी राज्यात शिक्षणाची संधी होती. पण रामराज्यात सर्वांना शिक्षण उपलब्ध नव्हते. म्हणून भालेकरांनी रामराज्याची चिकित्सा करून शंबुक वधाच्या कथेवर टीका केली आहे. 'विद्येचे पाय' व 'उद्योगाचे हात' नसल्यामुळे शेतकऱ्यांची अशी दुरवस्था झाली आहे. हे भालेकरांनी विविध उदाहरणांद्वारे पटवून दिले आहे. भालेकरांच्या भाषणातून उपरोध, उपहास परखडपणा व निर्भिडता स्पष्ट होते. येथे महात्मा फुले यांच्या प्रभावाचा ठसा जाणवितो.

कृष्णराव भालेकरांची लेखनशैली तत्कालीन शैलीपेक्षा वेगळीच आहे. त्यांची वर्णनशैली, संवादात्मकता, प्रसंगी येणारा उपहास, उपरोध, परखडपणा, निर्भिडता हे लेखनाची वैशिष्ट्ये आहेत. एखादा प्रसंग शैलीदार पद्धतीने परिणामकारक करण्याची हातोटी भालेकरांना चांगलीच साधली अहे. भालेकरांचे विचार, उदात्त व शाश्वत मानवी मूल्यांनी भरलेले आहेत. जोश, आवेश, धारदारपणा, सोपेपणा थोडक्या शब्दांत आपला मुद्दा

प्रभावीपणे मांडणे, त्याचबरोबर दुसऱ्यांच्या मुद्यांवर अचूक प्रहार करणे हे सर्व गुण त्यांच्या लेखनशैलीचे आढळतात. श्रोत्यांना आपल्या कळकळीने आपलेसे करून घेणे, त्यांना साद घालणे यामुळे भालेकरांची शैली प्रभावी ठरली आहे. समर्पक म्हणी, कथा, दाखले, अभंग, व्यवहारी जीवनातील उदाहरणे देऊन भालेकरांनी जनसामान्यांसाठी सुसंवाद साधला आहे. हे त्यांच्या लेखनशैलीवरून स्पष्ट होते.

**संदर्भ सूची :**


१) 'कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय', संपा. सीताराम रायकर, महात्मा फुले समता प्रतिष्ठान, पुणे, प्रथमावृत्ती, पृ. १२२.

२) तत्रैव, पृ. १२५.

३) तत्रैव, पृ. १३२.

४) तत्रैव, पृ. १३०.

५) तत्रैव, पृ. १३१.

६) तत्रैव, पृ. १३६.

७) तत्रैव, पृ. १२१.

८) तत्रैव, पृ. २२५, 'निराश्रित हिंदु आणि ब्राह्मण क्षत्रिय'.

९) तत्रैव, पृ. २३१.

१०) तत्रैव, पृ. २३२.

११) तत्रैव, पृ. २३२.

१२) तत्रैव, पृ. १३८.

१३) तत्रैव, पृ. १३८.

१४) तत्रैव, पृ. २००.

१५) तत्रैव, पृ. २०१.

१६) तत्रैव, पृ. २०४.

१७) स्मरणिका, अशोक एरंडे 'अखिल भारतीय सत्यशोधक समाज', २८ वे अधिवेशन १९९९, तरवडी मुकुंदनगर, पृ. १५ भाषणे.

१८) उनि स्मरणिका, अशोक एरंडे अखिल भारतीय सत्यशोधक समाज, पृ. ५१.

१९) तत्रैव, पृ. १४२.

२०) नागनाथ कोतापल्ले, 'जोतिपर्व', स्वरूप प्रकाशन, प्रथमावृत्ती, जुलै २०००, पृ. १४०.

२१) उनि 'कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय', पृ. १४६.

२२) तत्रैव, पृ. १५५.

२३) तैत्रव, पृ. १५५, १५६.

२४) उनि कोत्तापल्ले नागनाथ, 'जोतिपर्व', पृ. १४१.

२५) 'सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील समग्र वाङ्मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, जुलै १९९९, पृ. १४.

२६) उनि 'कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय' , पृ. १६७.

२७) तत्रैव, पृ. १६९.

२८) तत्रैव, पृ. १८०.